<u>**नियमित दिवाणी दावा क्र. १२१/२०१८ मधील नि.क्र. २७ वरील आदेश**</u>

**(CNR No.MHRG14-000553-2018)**

१. सदरचा अर्ज प्रतिवादी क्र. १ यांने, त्यांस दाव्यास कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करुन कैफियत दाखल करण्यास परवानगी मिळणेकरीता दाखल केला आहे.

२. वादीने सदर अर्जावर निशाणी क्रमांक ३५ येथे म्हणणे देवून जोरदार हरकत घेतली आहे. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, सदर प्रतिवादीने त्यास झालेल्या विलंबाच्या प्रत्येक दिवसाचे कारण अर्जात नमूद केलेले नाही. त्यामुळे अर्ज नामंजूर करणेची विनंती केली आहे.

३. अर्ज, त्यावरील म्हणणे व अभिलेखावरील कागदपत्रे पाहीली. दोन्ही बाजूंचे वकीलांचा युक्तिवाद ऐकला.

४. न्यायालयीन अभिलेखाचे अवलोकन केले असता वादीने सदरचा दावा ठरावाकरीता व निरंतर मनाई हुकूमाकरीता दाखल केला आहे. परंतु, सदर प्रतिवादी यांना आपल्या वकीलांना भेटून कागदपत्रे देवून कैफियत तयार करणे शक्य झाले नाही. त्यामुळे सदर प्रतिवादीस त्यांची कैफियत दाखल करणेस विलंब झाला आहे. सदर प्रतिवादी हे त्यांची कैफियत दाखल करुन दाव्यास विरोध करणार असून त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी मिळावी तसेच प्रकरणांची वाढती संख्या टाळण्याकरीता व सदर दाव्याचा निकाल गुणदोषांवर लावणेकरीता सदर प्रतिवादी क्र. १ यांची कैफियत अभिलेखावर घेणे योग्य व संयुक्तिक आहे. करीता वरील बाबींचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश पारीत करणेत येत आहे.

<u>**आदेश**</u>

अर्ज मंजूर करणेत येत आहे.

WALI NILESH MALAKAPPA
Digitally signed by WALI NILESH MALAKAPPA
Date: 2022.05.07 15:36:28 +0530

ठिकाण – उरण

दिनांक – ०६/०५/२०२२

(निलेश म. वाली)

दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उरण.